ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "वारकरी संप्रदायाचे बदलते स्वरूप"



डॉ. संजय गायकवाड
प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
मारुतीराव हरिराव महाडिक कला व वाणिज्य,
महाविद्यालय मोडनिंब.

## प्रास्ताविक:

भक्ती चळवळीचा उदय प्रथम दक्षिण भारतात झाला असे मानले जाते. भक्ती ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती असून जेव्हा मानव पृथ्वीतलावर आला तेव्हापासूनच भक्ती या संकल्पनेचा उदय झाला. मध्ययुगीन काळात मानवाची सहज प्रवृत्ती कर्मकांडाकडे झुकली असताना भक्तिमार्गातून एक नवीन चळवळ निर्माण झाली. "भक्ती" हा मूळ शब्द संस्कृत भज या मूळ धातूपासून उत्पत्ती झालेला आहे भज या रूपिकेचा अर्थ उपासनेचे विभाजन, प्रेम, पूजा, समर्पण निष्ठा, धार्मिक आचार असा होय. भक्ती म्हणजेच प्रेममय सेवा या भक्तीचे नाते भावनेशी, हृदयाशी आहे. बुद्धीचा मार्ग हा अवघड असतो मात्र भावनेचा मार्ग सुकर असतो म्हणूनच भक्ती मार्ग हा सर्वश्रेष्ठ ठरला आहे. मोक्ष प्राप्तीचे किंवा ईश्वर प्राप्तीचे महत्त्वाचे साधन म्हणून भक्ती मार्गाकडे पाहिले जाते. मध्ययुगीन काळात भक्ती मार्गाची चळवळ सुरू झालेली होती. मुस्लिम आक्रमणाच्या वेळी अध्यात्म, अध्यापन, अध्ययन करणे म्हणजे एक प्रकारे संकटाला आमंत्रण देण्यासारखे होते अशा परिस्थितीत लोकांनी भक्ती चळवळीला पाठिंबा देत आंदोलनाला सुरुवात केली. त्यासाठी प्रसार माध्यम म्हणून लोकपीठ, व्यासपीठ, रंगपीठ याचा वापर करत महाराष्ट्रातील भक्ती चळवळ विकसित केली. या भक्ती चळवळीची उभारणी कनिष्ठ व मध्यमवर्ग जनतेनेच केलेली पहावयास मिळते भक्ती चळवळीने कोणत्याही जातीच्या मनुष्याला अध्यात्मक उन्नती साधता येते तसेच नैतिक सामर्थ्य ही वाढवता येते असा विश्वास सर्व थरातील लोकांमध्ये या भक्ती चळवळीच्या माध्यमातून झाला. म्हणूनच या चळवळीत ब्राह्मण ,कुणबी ,माळी, तेली, सुतार, सोनार ,महार, कुंभार इत्यादी भिन्न भिन्न जातीच्या लोकांचा समावेश असलेला आपणास पहावयास मिळतो.

भक्ती चळवळीचे स्वरूप: महाराष्ट्रातील भक्ती चळवळीच्या माध्यमातून अनेक संप्रदाय व पंथ निर्माण झाले असले तरी याचा मूळ उद्देश संपूर्ण समाजात मानवतेची शिकवण रुजवणे हाच होता. जात-पात, धर्म - भेद, लिंग वय याचा विचार न करता संतांनी मानवतेचा संदेश दिला. या भक्ती चळवळीकडे विशेषता धार्मिक चळवळ अध्यात्मिक चळवळ म्हणून पाहिले जाते. मात्र आधुनिक काळात सामाजिक प्रबोधनाचा एक महत्वाचा महामार्ग या दृष्टीनेया भक्तीचळवळीकडे पाहणे गरजेचे आहे. या चळवळीने प्रत्यक्ष समाज परिवर्तन करण्याचे ठरवून क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले आहे त्याचबरोबर सामाजिक समस्यांना वाचा फोडण्याची महत्त्वाची भूमिका देखील बजावली आहे.

महाराष्ट्रात भक्ती संप्रदायाची मोठी प्राचीन परंपरा आहे नाथ संप्रदाय हा आदीपंत असून त्यातूनच महानुभव, वारकरी ,दत्त, शक्ती इत्यादी संप्रदाय निर्माण झाले या संप्रदायाने धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. त्यामुळेच खऱ्या अर्थाने धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाशी हे संप्रदाय एकरूप झालेले आहेत.

## महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय:

महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायातील अत्यंत श्रेष्ठ व महत्त्वाचा संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाकडे पाहिले जाते. वारकरी संताने व अनुयायाने सदाचरणाचा साधा आणि सोपा मार्ग लोकांना दाखवला. पारमार्थिक अनुभवांचा साठा किंवा ज्ञान आणि ते प्राप्त करून ते उपभोगण्याचा साधन मार्ग या अर्थाने संप्रदाय हा शब्द पुढे आला आहे. ज्ञानाने जीवाचे स्वरूप व त्याचे पारमार्थिक ध्येय ठरले आहे ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीत श्रद्धा, विश्वास, आचार, उपासना, तत्त्वज्ञान इत्यादीचे संक्रमण आणि त्यातून विशिष्ट प्रकारची परंपरा म्हणजेच संप्रदाय होय. वारकरी संप्रदायाची भूमिका ही सर्वसमावेशक असल्याने परमेश्वर सर्वत्र आहे, मूर्ती हे केवळ त्याचे माध्यम आहे प्रत्येक भक्ताला आपल्या भावणाऱ्या मूर्तीतून भक्ती आणि श्रद्धा त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचा अनुग्रह घेणे शक्य आहे. असा उदारमतवादी विचार या संप्रदायात असल्याने सर्वसामान्यामध्ये एक प्रकारची आत्मीयता वाढलेली दिसून येते.वारकरी संप्रदायास भागवत धर्म अथवा माळकरी पंथ असे ही म्हणतात. महाराष्ट्रात संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करण्याची महत्त्वाची भूमिका या संप्रदायाने पार पाडलेली आहे. वारकरी संप्रदाय हा सर्वसामान्य बहुजनांचा संप्रदाय म्हणून ओळखला जातो. एक प्रकारे भक्ती बरोबरच बुद्धिनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, तत्वज्ञाननिष्ठ आणि सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोन समोर ठेवून वारकरी संप्रदायाचा विकास होत चाललेला आहे. या संप्रदायाचे मुख्य दैवत पंढरपूरचा पांडुरंग असून पांडुरंगाच्या ठायी सर्व देवतांना पाहण्याची आणि अनुभवण्याची प्रथा आहे म्हणूनच आज विठ्ठल हा महासमन्वयक असे म्हणणे यथार्थ ठरेल. वारकरी संप्रदायाच्या स्थापनेबद्दल निश्चित माहिती उपलब्ध होत नसली तरीही संत ज्ञानेश्वर यांनी वारकरी संप्रदायाला तात्विक बैठक प्राप्त करून दिली तर संत नामदेव, संत एकनाथ ,संत तुकाराम, संत निळोबाराय इत्यादीने वारकरी संप्रदायाचा विस्तार महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर नेला. व्रतवैकल्ये, कर्मकांड, जाती, विशिष्ट वेदाचे अध्ययन याचा अधिकार या अशा अनेक बंधनातून मुक्त करत संताने परमार्थ साधण्यासाठी साधा सुलभ मार्ग उपलब्ध करून दिला. यासाठी प्रपंच आणि परमार्थ यांचा समतोल आणि समन्वय साधून अध्यात्मिक कर्मयोगाची शिकवण सर्वसामान्य लोकापर्यंत पोहोचवली. यासाठी आचार मार्ग आणि साधी सोपी शिकवण सर्वसामान्यांच्या समोर ठेवून संप्रदायाची भूमिका व्यापक बनवली. या व्यापक भूमिकेतूनच संतांनी संपूर्ण विश्वकल्याणाची भूमिका मांडली. संपूर्ण ब्रह्मांड ऐक्य तत्त्वाचा अनुभव घेण्यासाठीच या संप्रदायाने आपली ध्येयपूर्ती साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. यातूनच वारकरी संप्रदायाचे वेगळेपण व असाधारण महत्त्व दिसून येते. या संप्रदायाने स्त्री-पुरुष भेद ,धर्मभेद ,जातीभेद, वर्णभेद याला तडा दिलेला पहावयास मिळतो त्यामुळेच सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने या संप्रदायात सामील होताना अपल्याला पाहावयास मिळतात. म्हणजेच एक प्रकारे आध्यात्मिक लोकशाही रुजवण्याचा हा महत्वाचा प्रयत्न आहे. या संप्रदायात ईश्वर प्राप्तीसाठी किंवा साधनेसाठी संसार त्यागाची आवश्यकता नाही असे आग्रहाने सांगून कर्मकांड, अंधश्रद्धा, भोंदूगिरी इत्यादी अनिष्ट प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. वारकरी संप्रदायाने व्यक्तिगत जीवनाच्या उद्धाराबरोबरच सर्व समाजाचा उद्धार झाला पाहिजे याला विशेष महत्त्व दिलेले आहे. त्यामुळेच आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक एकोपा वाढल्याचे पहावयास मिळते. वारकरी संप्रदायाचे प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरकडे पाहिले जाते यातूनच पंढरपूरची वारी ही नित्याची बाब बनली आहे. वारकरी संप्रदायाच्या प्रसाराचे, लोकसहभागाचे व लोकसंस्कृतीचे एक माध्यम म्हणून पंढरपूरला येणाऱ्या पालख्या व दिंड्या यांचा समावेश होतो. आजही पंढरपुरात आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या वारीसाठी देशभरातून लोक येताना पहावयास मिळतात. वारकरी संतांनी पारंपारिक भक्ती मार्गाचा वापर करत समाजातील अनिष्ट विचारावर आघात घालण्याचाही प्रयत्न केलेला आहे. दया, क्षमा, शांती, समता, बंधुत्व इत्यादी नैतिक मूल्याची विचारसरणी सर्वसामान्य लोकांमध्ये निर्माण करून एकप्रकारे समन्वयाची भूमिका पार पाडली.ही संतांची विचारसरणी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अधिष्ठानाचा पाया प्राप्त करून देणारी ठरते. वारकरी संतांनी आपल्या अनुयायांना सदाचरणाचा साधा व सोपा मार्ग सांगितला आहे. ज्ञानेश्वरी आणि तुकारामाची गाथा या दोन ग्रंथाला युनेस्कोने मराठी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथ म्हणून निवडल्याने जागतिक स्तरावर प्रसार होण्यासाठी या ग्रंथाचे इंग्रजी, स्पॅनिश व फ्रेंच या भाषेत भाषांतर झाल्याने वारकरी संप्रदाय 'विश्वात्मक संप्रदाय' म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यामुळे आजच्या आधुनिक विज्ञान युगातही वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून भक्ती आणि कर्म या मार्गाचा वापर केलेला पाहावयास मिळतो.

वारकऱ्यांचे समाज प्रबोधनाचे मार्ग:आधुनिक काळात वारकरी संतांनी सांगितलेला मार्ग मठाधीपती, फड, मठ, पालखी इत्यादीच्या माध्यमातून ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्याचे महान व उल्लेखनीयकार्य केले आहे. पंढरपुरात शुद्ध एकादशी दिवशी वारीला येऊन दशमी एकादशी व द्वादशी यामध्ये होणाऱ्या कीर्तन, प्रदक्षिणा, दिंडी, खिरापत यात सहभागी होणाऱ्या वारकरी समुदायाला फड असे म्हणतात. वारकरी प्रमुख व त्यांच्या शिष्य मंडळींचा संघटित असलेला समुदाय फडाच्या स्वरूपात असतो. संत नामदेवापासून फडाची परंपरा चालत आली आहे. तुकाराम महाराज यांच्यानंतर वारकरी संप्रदाय फडांणीच मोठ्या प्रमाणात वाढवला फडाच्या माध्यमातून भारतीय समाज जीवनात समानता आणण्याचे आदर्श काम केलेले आहे. वारीमध्ये हजारो भावीक एकत्र येऊन एक प्रकारे भक्ती संमेलन भरवल्याची जाणीव करून देतात. फडांमुळे वांग्मय आणि भाषिक विकास घडवून आल्यामुळेच आज मराठी, हिंदी, कन्नड, तेलगू आणि इंग्रजी या वेगवेगळ्या भाषेतून वारकरी संप्रदायवर चर्चा केली जाते. आज ज्ञानेश्वरी , तुकाराम गाथा या ग्रंथाचे कानडी व हिंदी भाषेत प्रकाशन करून भारतातील समतावादी विचार करणाऱ्या लोकांपर्यंत वारकरी पंथाचे कार्य पोहोचवले गेले आहे. म्हणूनच वारकरी संप्रदाय समाजातील तळागाळातील लोकापर्यंत पोहोचून त्यामध्ये सतत वाढ होत असलेली दिसून येते. ज्ञानेश्वर , तुकाराम यासारख्या संतांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून समाजाचा उद्धार करताना भोंदूगिरी, यज्ञ, कर्मकांडावर हल्ला केला. आधुनिक काळातील भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या समाजामध्ये खोटी अंधश्रद्धा, व्यसने, व्याभिचार त्याचप्रमाणे अनेक अनिष्ट रूढी परंपरा या बाबीवर फडाचा प्रमुख आपल्या प्रवचन, कीर्तनातून समाज जागृती करतोच त्याचप्रमाणे आरोग्य, नैतिक जीवन, दारूबंदी, भोंदूगिरी, मांसाहार,मद्यपान यासारख्या अनेक प्रश्न संबंधी फडाच्या माध्यमातून आपले विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत सदाचरणाचा आदर्श मार्ग पोहोचण्याचे कार्य आजही चालू आहे. फडाच्या माध्यमातून सांप्रदायिक कार्यक्रमात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचाही सहभाग वाढल्याने किर्तन, प्रवचन या माध्यमातूनही स्त्रिया आधुनिक जीवनाला स्पर्श करून लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम या फडाच्या माध्यमातून करतात. या फडाच्या माध्यमातून काळानुसार सुधारणावादी दृष्टिकोन स्वीकारून वारकरी संप्रदायाचा प्रसार केला जात आहे त्यामुळेच सर्वसामान्य लोकांबरोबरच समाजातील विद्याविभूषित वर्गही वारकरी संप्रदायाकडे आकर्षित होऊ लागला आहे. आजच्या विज्ञान युगातही वारीच्या काळात लाखो भाविक विविध राज्यातून जमा होतात याचे सर्व श्रेय फडाना द्यावे लागेल.

### वारकरी संप्रदायाचे उपक्रम:

पंढरपुरात विठ्ठल मंदिराच्या भोवती वारकरी संप्रदायाचे मठ, धर्मशाळा, सांप्रदायिक वाडे, आश्रम यांचा समावेश होतो या सर्व मठातून सांप्रदायिक उपक्रमाबरोबरच भागवत धर्माचा प्रसार केला जातो. मठाची संकल्पना प्राचीन काळापासून होती ह्यासंबंधीचा शिलालेख आणि वांग्मय साधनात उल्लेख आल्याचे पहावयास मिळते. मठ म्हणजे छात्र, साधू इत्यादींचे निवासस्थान होय. संस्कृत मधील मढ म्हणजेच वास्तव करणे या धातूपासूनच हे नाव बनले आहे. आज पंढरपुरात मोठ्या प्रमाणात मठ वाढलेले पाहावयास मिळतात. भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून मठाची परंपरा विविध धर्मात पहावयास मिळते. वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या भाविकाची राहण्याची सोय व्हावी या उद्देशाने मठाची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत गेली. आज मठ संस्कृतीची आणि सांप्रदायिकतेची आदर्श केंद्रे बनत चाललेली पहावयास मिळतात. या मठातून भजन, कीर्तन, ध्यान,नामस्मरण यातून आदर्श समाज निर्माण करण्याची एक अध्यात्मिक शैक्षणिक संकुल निर्माण होत आहे. मठातूनच शिक्षण घेऊन अनेक कीर्तनकार, प्रवचनकार निर्माण झालेले पाहवयास मिळतात. ते समाजाला आधुनिक विचारसरणीचा स्पर्श करत योग्य प्रकारची दिशा देण्याचे काम करीत आहेत. मठाच्या माध्यमातून विविध जाती धर्माचे , विविध विचारांचे लोकांमध्ये आदान - प्रदान होऊन एक प्रकारे सामाजिक, सांस्कृतिक चळवळीला मठाच्या माध्यमातून बळ मिळत आहे. त्यामुळेच ही मठांची चळवळ समाज परिवर्तनातील राष्ट्रीय चळवळ होताना दिसत आहे. मठाच्या उपक्रमातून अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, आरोग्य, शिक्षण, मानवी नैतिक मूल्य, मानवाची कर्तव्य लोकांना पटवून देण्याचे कार्य यातून होत आहे. सामाजिक समस्या वाढत असताना मठाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विविध भाषेतील महत्वाचे विचार एकमेकांना आदान - प्रदान करून भाषिक सलोखा आणि ऐक्याची भावना वाढीस नेण्याची महत्त्वपूर्ण भूमिका मठ बजावत आहेत. मठाच्या

माध्यमातूनही अनेक स्त्रियां सांप्रदायिक कार्यात सहभागी होऊन प्रतिगामी विचारधारा बाजूला करत पुरोगामी विचारधारा राबवत आहेत. मठाच्या माध्यमातून नाम सप्ताह,सांप्रदायिक उत्सव, पारायणे याचबरोबर आरोग्य, पर्यावरण, शेती उत्पन्न,वन उत्सव इत्यादी उपक्रम साजरे करून राष्ट्रीय कार्यात आणि आर्थिक उत्पन्नात मोलाची भूमिका बजावली आहे.

वारकरी संप्रदायात वारीला महत्त्व असल्याने विठ्ठलाचे वर्षातून एकदा तरी दर्शन व्हावे या भूमिकेतून वारकरी आजच्या काळातही पालख्याच्या आणि दिंडीच्या माध्यमातून पंढरपूरला येत असतो. वारकरी संप्रदायाचा प्रेमभक्तीचा प्रचंड प्रवाह जिवंतपणे वाहत ठेवण्याचे कार्य या पालख्या आणि दिंडी च्या माध्यमातून केले जात आहे. वारकरी संप्रदायाच्या परंपरेत वारी, पालखी, दिंडी हे एक प्रकारे प्रचार आणि प्रसार त्याचप्रमाणे आचार मार्गाचे प्रभावी माध्यम म्हणून पहावयास मिळते. समाजातील उच्च निचता, जातीपाती नाहीशा करत पालखी आणि दिंडी सोहळ्यात एकतेची शिकवण समाजासमोर आदर्श निर्माण करीत आहे. हा समुदाय एका विशिष्ट भावनेतून एकत्र येऊन सूत्रबद्ध शिस्तीने समाजातील लोकांसमोर आदर्श नीतीतत्त्वाची जाणीव निर्माण करण्याची भूमिका बजावत आहे.

## वारकरी संप्रदायाचे आजच्या काळातील योगदान:

आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात काळ बदलला असला तरी भारतीय संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी वारकरी संप्रदाय याचा शासनाच्या माध्यमातूनही विविध उपक्रमाद्वारे सामाजिक बदल घडवून आणण्याचे कार्य करीत आहे. आज पाश्चात संस्कृतीमुळे समाजावर जो आघात होत आहे ते थांबवण्याचे कार्य हा वारकरी संप्रदाय करू शकतो याला फक्त शासकीय पातळीवर योग्य ती दिशा देऊन त्याची योग्य अंमलबजावणी होणे ही काळाची गरज आहे. आजच्या जागतिकीकरण व उदारीकरण यामुळे सर्वच देशावर एक मोठे आव्हान निर्माण झालेले आहे अशा परिस्थितीत भारतातील विशेषता महाराष्ट्रातील संतांचे वास्तविक विचार युवकांच्या पुढे योग्य पद्धतीने मांडल्यास समाजात भान न राहिलेली युवा पिढी भरकटत न जाता एका योग्य दिशेला जातील एवढे सामर्थ्य संतांच्या ग्रंथामध्ये आहे, याची जाणीव करून देण्याची वेळ आता आली आहे. आज फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम यासारख्या प्रसारमाध्यमांनी लहानापासून मोठ्यापर्यंतसर्वांना बांधून ठेवलेले आहे त्या सर्वांना आपल्या संतांच्या नैतिक विचारसरणीतून, आचारातून, कृतीतून दाखवून देऊन त्या समाजाला एक नैतिक आदर्श समाज निर्माण होईल अशा प्रकारची भूमिका या साहित्यातून होऊ शकते असा विश्वास आहे. आज पैशाच्यामागे लागलेला युवक भौतिक जीवनात व्यसनाधीन, चैनी जीवन जगण्याच्या माध्यमातून नीतिमत्ता हरवत चालला आहे त्या युवकाला आपण वारकरी संप्रदायाच्या विचारसरणीतून योग्य दिशा देण्याचे कार्य केले पाहिजे. वारीच्या माध्यमातून लाखो लोक यात सहभागी होत असतात या लाखो लोकांमध्ये शासनाच्या माध्यमातून आर्थिक मदतीच्या साह्याने समाज प्रबोधन व त्याची प्रत्यक्ष कृती राबवून त्या माध्यमातून यशस्वी होणाऱ्या लोकांना बक्षिसाच्या माध्यमातून सत्कार होणे आवश्यक आहे. आज आपण वृक्षदिंडीच्या माध्यमातून अनेक परिसरात राष्ट्रीय सेवा योजना या माध्यमातून ज्याप्रमाणे अनेक वृक्षाची लागवड केली त्याचप्रमाणे त्याच युवकांचा उपयोग करीत आपण समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा कर्मकांड बाजूला करून मानवामध्ये आदर्श विज्ञाननिष्ठ विचार पोहोचवला पाहिजे. आज मानव समाज व पर्यावरण याचे संतुलन बिघडत चालले आहे यासाठी या संप्रदायाच्या माध्यमातून नैतिकतेच्या मूल्याबरोबरच पर्यावरणाचा ही विकास आणि आधुनिक काळातील मानवाला येणाऱ्या समस्येची जाणीव करत आपण आदर्श समाज कसा निर्माण होईल याचा विचार केला पाहिजे आणि खऱ्या अर्थाने वारीमध्ये समाविष्ट असणाऱ्या लोकांना एक योग्य दिशा देत संपूर्ण मानवजातीचा विकास साधण्याची प्रक्रिया सुरू केली पाहिजे असे वाटते.

## निष्कर्ष:

* आधुनिक काळातील समाज प्रबोधनाचा एक महामार्ग म्हणून वारकरी संप्रदाय पाहिले जाते
* वारकरी संप्रदायाची भूमिका उदारमतवादी आणि सर्वसामान्य असते
* वारकरी संप्रदायातील संतांनी मानवतेचा संदेश दिला
* वारकरी भक्ती बरोबरच तत्त्वज्ञानिष्ठ सामाजिक सुधारणा बुद्धिनिष्ठ विज्ञाननिष्ठ विचार मांडण्याचा प्रयत्न करतो

*महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाने संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे
* वारकरी संप्रदायाने आध्यात्मिक सांस्कृतिक आणि सामाजिक एकोपा वाढवण्यास मदत केली आहे
* वारकरी संप्रदाय प्रसाराचे लोकसहभागाचे लोकसंस्कृतीचे एक प्रभावी माध्यम आहे
*महाराष्ट्रातील संतानी आपल्या विचारसरणीच्या अधिष्ठानाचा पाया घातला आहे
*वारकरी संप्रदाय समाज परिवर्तनाचे एक राष्ट्रीय चळवळ निर्माण केली आहे
*वारकरी संप्रदायाने मानवता नैतिकता पर्यावरण आरोग्य इत्यादींच्या माध्यमातून प्रबोधनाचा योग्य मार्ग दिला आहे.

## संदर्भ ग्रंथ यादी

१) कुलकर्णी अ.रा.- "महाराष्ट्र समाज आणि संस्कृती" डायमंड पब्लिकेशन पुणे प्रथम आवृत्ती २००८
२) कदम विकास- "वारकरी संप्रदायाचा इतिहास आणि पंढरपुरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य" अरुणा प्रकाशन लातूर प्रथम आवृत्ती २०१४
३) कोलते वि.भी.-"मराठी संतांचे सामाजिक कार्य" द का कोलते प्रकाशन यवतमाळ प्रथम आवृत्ती १९६८
४) भा.प.बहिरट व प.ज्ञा. भालेराव "वारकरी संप्रदाय उदय व विकास" पुणे १९९९
५) दादा महाराज मनमाडकर- वारकरी संप्रदाय तत्वज्ञान व सद्यकालीन औचित्य १९८८
६) शंकरराव खरात- "संतांची सामाजिक दृष्टी" कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २००५